## जनसंपर्क विभाग

# आजपासून विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिर

जळगाव दि. २९ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात युवा व क्रीडा मंत्रालय, नवी दिल्ली, रा.से.यो. प्रादेशिक संचालनालय व रा.से.यो. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने उद्यापासून राष्ट्रीय एकात्मता शिबीराला प्रारंभ होणार असून बुधवारी सायंकाळपर्यंत ओरिसा, राजस्थान, गोवा, केरळ या राज्यांचे संघ दाखल झाले आहेत. या शिबीरात ११ राज्यातील एकूण २०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

६ डिसेंबर पर्यंत हे शिबिर होणार आहे. उद्या गुरूवार दि. ३० नोव्हेंबर रोजी सायं. ४ वाजता या शिबीराचे उद्घाटन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्या हस्ते होणार असून कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी अध्यक्षस्थानी राहतील. यावेळी प्र- कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे यांची उपस्थिती असणार आहे. विद्यापीठाच्या अधिसभा गृहात हा कार्यक्रम होणार आहे. बुधवारी सायंकाळपर्यंत ओरिसा, राजस्थान, गोवा, केरळ या राज्यांच्या संघासह पुणे, गोंडवाना, औरंगाबाद या विद्यापीठांचे संघ दाखल झाले आहेत. उद्या सकाळी आलेल्या संघांची नोंदणी होईल त्यानंतर ४ वाजता उद्घाटन समारंभ होईल. उद्घाटनानंतर संघव्यवस्थापकांची बैठक होईल.

शुक्रवार पासून योगा, व्याख्यान, सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आणि गटचर्चा असे नियोजन करण्यात आले आहे. ४ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता मुळजी जेठा महाविद्यालय ते नुतन मराठा महाविद्यालय अशी शोभायात्रा काढण्यात येणार आहे. दि.६ डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता जळगाव जिल्हा पोलिस अधिक्षक एम. राजकुमार व कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या मुख्य उपस्थितीत शिबीराचा समारोप होईल. अशी माहिती रा.से.यो.चे विभागीय संचालक अजय शिंदे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील आणि रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी दिली.

.........................................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २९ नोव्हेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी